# फिनिक्स मेट्रो महाराष्ट्र मंडळ गणेशोत्सव २००६

महाराष्ट्रात सगळया सण आणि उत्सवांमध्ये सगळयात उच्च आणि मानाचं स्थान मिळालं आहे ते गणेशोत्सवाला. पण हा सण फक्त महाराष्ट्रापुरता आणि भारतापुरता मर्यादित कधीच नव्हता त्यामुळे भारताबाहेर राहणारे अनेक भारतीय लोक हा सण आपापल्यापरीने साजरा करतात. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही फिनिक्स मेट्रो महाराष्ट्र मंडळातर्फे ३ सप्टेंबर रोजी गणोशोत्सव साजरा केला गेला २००५ - २००६ या वर्षीच्या कमिटीच्या कार्यकाळातला हा शेवटचा कार्यक्रम होता.

या वर्षी गणपतीची पूजा पुष्पक आणि दीपाली कर्णिक या दांपत्याच्या हस्ते करण्यात आली. पूजेनंतर वेगवेगळया प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाले. त्यामध्ये सुरवातीला लहान मुलांनी स्टेजवरून रेकॉर्ड डान्स, गायन असे विविध प्रकारचे गुणदर्शन केले. त्यानंतर स्पंदन नावाचा एक वेगळा कार्यक्रम सादर झाला. त्यात काही व्हिडियो क्लिप्स् दाखवण्यात आल्या होत्या ज्यामध्ये पी एम् एम् एम् बद्दल लोकांनी सुचनांद्वारे आणि अभिप्रायाद्वारे आपली मतं प्रदर्शित केली होती. "जोडी नंबर वन" हा सगळयांना उत्सुकता असलेला गेम शो यानंतर सादर झाला यात दहा जोड्यांनी भाग घेतला होता. स्पर्धा एकुण तीन फेऱ्यांमधुन पार पडली. पहिल्या फेरीत या जोड्यांना स्वतःची ओळख नाविन्यपूर्ण रितिने करुन द्यायची होती. दुसऱ्या फेरीत त्यांना ऐनवेळी एक विषय देण्यात आला होता त्यानुसार त्यांनी एक मिनिट भांडून दाखवायचे होते व तिसऱ्या फ़ेरीत स्वरचित किंवा काहीतरी वेगळा असा उखाणा घ्यायचा होता. स्पर्धा खुपच अटीतटीची आणि रंगतदार झाली. केदार आणि शीतल कर्णिक हे जोडी नंबर वन चे विजेते ठरले. मंडळातीलच काही लोकांनी परीक्षक म्हणुन काम पाहिले. मग सांस्कृतिक कार्यक्रमांची सांगता अहवाल वाचनाने करण्यात आली, पण हे अहवाल वाचनही अत्यंत नाविन्यपूर्ण पद्धतीने करण्यात आले होते. मंडळाचा वर्षभराच्या कार्यक्रमांचा आढावा बातम्यांच्या स्वरुपात रेकोर्ड करण्यात आला होता व तो मोठ्या पडद्यावरून प्रक्षेपित करण्यात आला. लोकांनी या अभिनव अशा संकल्पनेला भरभरून दाद दिली आणि मनापासून कौतुक केले. शेवटी झालेल्या महा आरती मध्ये सगळयांना सहभागी होता यावं म्हणुन आरत्या पडद्यावरून प्रोजेक्ट करण्यात आल्या होत्या. आरतीनंतर गणपतीच्या प्रसादासोबत छोले-पुरी, शिरा, आणि केळी यांचे वाटप करण्यात आले व यानंतर पुन्हा भेटण्याच्या आश्वासनाने लोकांनी एकमेकांचा निरोप घेतला.

सौ. नेत्रा अग्निहोत्री